| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br><br>**प्रेसनोट** | **2025**<br><br>**CB/ 32/2025** |
| **गुन्हे शाखा, नवी मुंबई** | | **दिनांक ३१.०५.२०२५** |

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हदद्‌ीतील चोरी / गहाळ झालेले रू. ११,९१,८००/- किंमतीचे ५८ मोबाईल फोन हस्तगत करुन मुळ मालकांना हस्तांतर केले बाबत.

---

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हदद्‌ीतील पोलीस ठाण्यांचे अंतर्गत चोरी झालेले व गहाळ झालेले मोबाईल फोनचे तपास करून ते हस्तगत करण्याबाबत श्री.मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, व श्री. दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), नवी मुंबई यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने गुन्हे शाखेचे श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, व श्री. अजयकुमार लांडगे, सहा. पोलीस आयुक्त, यांनी गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांची वेळोवेळी आढावा बैठक घेवुन भारत सरकारचे **CEIR** पोर्टल वापराबाबत व त्याआधारे मोबाईल फोनचे शोध घेण्याबाबत प्रशिक्षण आयोजित केले होते.

त्यानुसार गुन्हे शाखा, कक्ष-१ वाशी, नवी मुंबई चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.निरज चौधरी यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसह दिनांक १२/०५/२०२५ ते दिनांक ३१/०५/२०२५ रोजी दरम्यान विशेष मोहिम राबवुन नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हदद्‌ीतील चोरी / गहाळ झालेले रू. ११,९१,८००/- किंमतीचे ५८ मोबाईल फोन महाराष्ट्र व भारतातील इतर राज्यातुन हस्तगत केलेले आहेत.

नमुद हस्तगत मोबाईल फोन हे आज दिनांक ३१/०५/२०२५ रोजी तक्रारदार यांना गुन्हे शाखा, कक्ष-१ वाशी, येथे बोलावुन त्यांचे मोबाईल फोन सन्मानपुर्वक हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत. मोबाईल परत मिळालेल्या नागरीकांनी समाधान व्यक्त करून पोलीसांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत.

सदरची कामगिरी गुन्हे शाखा, कक्ष-१ वाशी नेमणुकीतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक निरज चौधरी, पोउपनि सचिन बाराते, पोशि/ विशाल सावरकर तसेच गुन्हे शाखा कक्ष-३ चे पोशि/संतोष तांदळे यांनी केलेली आहे.

★★★★★★★★★★